नवराष्ट्र

# सायबर सुरक्षा मोहिमेसाठी चौघांची निवड

डोंबिवली, (वा.) क्विक हील फाऊंडेशनच्या सहकार्याने सायबर जागरूकता मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी विद्यार्थ्यांना दिनांक ११ जून २०२४ रोजी मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये बी.एससी.आयटी डिपार्टमेंटचे विद्यार्थी देवेन पाटील, गौरव कुमार, नेहा सिंग, श्रुती साहू राबविलेल्या सायबर सुरक्षा जागरूकतेला चालना देण्यासाठी क्लब ऑफीसर म्हणून निवड करण्यात आली.



क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सायबर सिक्युरिटी क्लबचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन क्विक हील फाउंडेशन कार्यालय, विमान नगर येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण दरम्यान अजय शिर्के, सुगंधा दाणी, गायत्री केसकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि सायबर सुरक्षेचे महत्त्व, सायबर सिक्युरिटी अवेअरनेसबद्दल विद्यार्थ्यांना व सामाजिक घटकांना मार्गदर्शन करून त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्याचे काम करणार आहेत. तसेच विभागप्रमुख प्रा. रुपाली पाटील यांची या अभियानासाठी शिक्षक समन्वयक म्हणून निवड करण्यात आली. तसेच अनेक गोष्टींवर मार्गदर्शन केले. या प्रकल्पाबाबत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. ज्योती पोहाणे म्हणाल्या की, निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीबरोबरच सामाजिक जबाबदारीही पार पाडावी. तसेच हे अभियान सक्षमपणे राबविण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. ज्योती पोहाणे, उपप्राचार्य डॉ. धनंजय वानखडे, आयटी विभाग प्रमुख रुपाली पाटील यांचे सहकार्य लाभले.

Thane Navi Mumbai Palghar Edition
Jun 25, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com